महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक : एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/जाहिरात** **दिनांक : २८ जुलै, २०२२**

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब, मुख्य परीक्षा २०२० - परीक्षेच्या आयोजनाबाबत**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा - २०२० च्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या उत्तरतालिकेसंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद व मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे दाखल न्यायालयीन प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२० पुढे ढकलण्यात येऊन मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या अंतिम निर्णयानंतर सदर परीक्षेचे सुधारित दिनांक जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे दाखल न्यायालयीन प्रकरणी मा. न्यायाधिकरणाकडून मूळ अर्ज खारीज (Dismiss) करण्यात आले आहेत. यास्तव, विषयांकित महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब, मुख्य परीक्षा - २०२० खालील दिनांकास आयोजित करण्यात येत आहे :-

| अ.क्र | परीक्षा | वार व दिनांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - २०२० संयुक्त पेपर क्रमांक १ | रविवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२२ |
| २ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - २०२० पेपर क्रमांक २ - पोलीस उप निरीक्षक | रविवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ |
| ३ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - २०२० पेपर क्रमांक २ - राज्य कर निरीक्षक | शनिवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ |
| ४ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - २०२० पेपर क्रमांक २ - सहायक कक्ष अधिकारी | रविवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२२ |

**२.** प्रस्तुत परीक्षेकरीता दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध अधिसूचना/जाहिरातीमधील तरतुदीमध्ये कोणताही बदल नाही.

**३.** विषयांकित परीक्षेकरीता प्रवेशास पात्र उमेदवारांना नवीन प्रवेशप्रमाणपत्र स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी उपलब्ध करून देण्यात येतील.

सहसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई